# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ६२-२३ दिनांक- २४/०२/२०२३

## मसाज स्पा सलुनच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणा-या ०२ पुरुष आरोपीतांस अटक करुन २ पिडीत त्यातील एक अल्पवयीन मुलींची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,भाईंदर यांची कारवाई.

दिनांक २२/०२/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सॉफ्ट टच स्पा ॲण्ड सलुन, शॉप नं. ००१, अे-६ सेक्टर-५, न्यु शांतीनगर को. ऑ. हौ. सोसायटी, भारत गॅसजवळ, शांती प्लाझा, नयानगर, मिरारोड (पुर्व) या गाळयाच्या स्पाचे चालक हिना कुरेसी व व्यवस्थापक तौसिफ खान हे पुरुष गि-हाईकाडून मसाज व वेश्यागमनाचा मोबदला घेवून मसाजच्या नावाखाली सॉफ्ट टच स्पा ॲण्ड सलुनमध्ये ठेवलेल्या मुलीला वेश्यागमनासाठी पुरवितात.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पो.नि. श्री. समीर अहिरराव नेम. प्रभारी अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदर यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन सॉफ्ट टच स्पा ॲण्ड सलुनचे व्यवस्थापक तौसिक जावेद खान, वय-२३ वर्ष, रा. अंधेरी (प.) मुंबई यांचे वर नमुद ठिकाणी असलेल्या स्पा सलुनमध्ये बोगस गि-हाईक व पंच यांचेसह प्रवेश करुन वेशागमनाकरीता व अतिरिक्त सेवाकरीता मुलीची मागणी केली असता तौसिक खान यांचेशी पैशाची बोलणी करुन त्याने पंचासमक्ष रक्कम स्विकारुन एक अल्पवयीन मुलगी हिस स्पा सलुनमध्ये काम करणारा सफाई कामगार गोपालकुमार विदयानंद माली यास सांगुन बोगस गि-हाईकासोबत वेशागमनाकरीता पाठविले असता सदर ठिकाणी पोलीस पथकाने पंचासह १७.४० वा. छापा करवाई करुन ०१ अल्पवयीन मुलगी वय-१७ वर्ष, ०१ महिने व सदर स्पाचे दुस-या रुममधील पिडीत मुलगी वय २८ वर्ष यांच्याकडे विचारपुस केली असता चौकशीत व्यवस्थापक तौसिफ खान, सफाई कामगार गोपालकुमार विदयानंद माली, रा. नयानगर, मिरारोड पुर्व व पाहिजे आरोपी श्रीमती हिना कुरेशी रा. अंधेरी, मुंबई असे सदरचा व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने सपोउपनि. यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन तौसिफ खान, गोपालकुमार विदयानंद माली व पाहिजे महिला अरोपी हिना कुरेसी यांच्या विरुध्द नयानगर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I १२६/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३६६ (ए), ३७० (ए), ३७० (३), ३७२, ३४ सह अ.व्या.प्रति. अधि. १९५६ चे कलम ३,४,५ सह बालकांचे लैगिंक अपराधापासुन संरक्षण अधि. २०१२ चे कलम १७,१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन २ पिडीत त्यातील एक अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात आली.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.फै. उमेश पाटील, विजय निलंगे, चा.पो.हवा. गावडे, पो. अंम. केशव शिंदे, म.स.ब. अपर्णा गायकवाड सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

------ooo-----